**<u>प्रथम मान्यता आदेश</u>**

प्राथमिक शिक्षण विभाग,जि.प.सोलापूर
जा.क्र.जिपसो/शिक्षण/प्राथ/खाप्राशा-२/प्र.मा./२०२६/438/ 1553
सोलापूर दिनांक 20 MAR 2026

**प्रति,**

**अध्यक्ष/सचिव,**
**धनशैल्य शिक्षण संस्था, अकलुज, ता. माळशिरस, जि. सोलापूर संचलित**
**धनशैल्य विद्यालय, ३१६/२/अ, गिरझणी, ता. माळशिरस, जि. सोलापूर**

**विषय:-** सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी दिलेल्या शाळेस प्रथम मान्यता देणेबाबत.

**संदर्भ:-**
१) सि.सा. घोरपडे, अवर सचिव महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचेकडील मान्यता पत्र क्रमांक:- एसएफएस-१०२३/प्र.क्र.२७१/एसएम-२ दिनांक १९ सप्टेंबर २०२४
२) अध्यक्ष, क्षेत्रस्तरीय प्राधिकरण तथा शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील जा.क्र.शिउसं/उमा-४०५/मान्यता/पुवि/२०२४-२५/०२६७ दिनांक ०६/०१/२०२५
३) गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, माळशिरस, ता. माळशिरस,जि. सोलापूर यांचेकडील जा.क्र./पंसमा/शिक्षण/१०५२/२०२५ दिनांक २३/०९/२०२५

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, आपल्या संस्थेस महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनि २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणेस / विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी संदर्भ क्र. १ अन्वये शासन परवानगी देण्यात आल आहे. तसेच संदर्भ क्र. २ अन्वये मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांनी शाळा सुरु करण्यास परवानगी दिलेली आहे. त्यानु विहित कालावधीत वर्ग सुरु करुन त्यांना प्रथम मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र. ३ अन्वये या कार्यालयास गटशिक्षणाधि पंचायत समिती, माळशिरस यांचे शिफारशीने सादर करण्यात आलेला आहे.

आपले प्रस्तावानुसार शाळेने पुढीलप्रमाणे वर्ग सुरु केलेले असून सदर वर्गांना खालील अटी व शर्तीस अधिन राहून **<u>प्रथम मान्यता</u>** देण्यात येत आहे.

| अ. क्र. | शासन मान्यता पत्र क्रमांक | संस्थेचे नांव व पूर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नांव व पूर्ण पत्ता | माध्यम | मान्यता वर्ष | मान्यता वर्ग (इयत्ता ) व शिक्षण मंडळ | शाळेचा प्रकार (प्राथमिक / उच्च प्राथमिक) | (नवीन शाळा / दर्जावाढ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | एसएफएस-१०२३/प्र.क्र.२७१ /एसएम-२ दिनांक १९ सप्टेंबर २०२४ | धनशैल्य शिक्षण संस्था, अकलुज, ता. माळशिरस, जि. सोलापूर | धनशैल्य विद्यालय, ३१६/२/अ, गिरझणी, ता. माळशिरस, जि. सोलापूर | इंग्रजी | २०२४-२५ | (इ. १ ली ते ८ वी, राज्यमंडळ.) सर्व शाखा | प्राथमिक ते उच्च प्राथमिक | नवीन शाळा |

**<u>अटी व शर्ती</u>**

१) संस्थने शाळा परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम शाळेचे ठिकाण इत्यादीमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.
२) शासनाने ज्या ठिकाणापासून शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

३) या अधिनियमातील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष **२०२४-२५** पासून असेल.

४) शैक्षणिक वर्ष **२०२४-२५** मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे, त्या वर्गाव्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत.

५) परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

६) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा शासनाच्या वेळोवळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे कार्यध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ मधील सर्व तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील.

७) शाळा/इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहितीकरिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फरक लावणे बंधनकारक राहील.

८) महाराष्ट्र स्वयंअर्स्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्याशाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

९) आपल्या शाळेस मान्यता असलेल्या वर्गाव्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाही.

१०) विहीत निकषानुसार शिक्षक कर्मचारी यांची नियुक्ती करावी.

११) संच निश्चिती व कर्मचारी मान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी.

१२) जनहितार्थ याचिका क्रमांक ४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.१४/०४/२००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

**अ.** शाळेमध्ये ०६ महिन्याच्या आत अग्निशामक यंत्रणा बसविणेत येईल.

**ब.** शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशिल व घातक वस्तू ठेवू नयेत.

**क.** शाळेच्या संबंधित कर्मचारीवृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशामक यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.

**ड.** शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याचे तसे (नॅशनल बिल्डिंग कोड ऑफ इंडिया) अंतर्गत विहीत केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधलेली असावी.

१३) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांनी UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा/वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

१४) संस्थेनी विहीत निकषानुसार मुदत ठेव संस्था व शिक्षणाधिकारी (प्राथ) जि.प.सोलापूर यांचे संयुक्त नावाने ठेवावी लागेल.

१५) शासनाच्या सद्या अस्तित्वात असलेल्या प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे संस्थेस बंधनकारक राहील

वरील निर्धारित केलेल्या अटी व शर्तीचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यास शाळेची मान्यता काढून घेण्याबाबत पुढील कार्यवाही करणेत येईल.

Digitally signed by
Kadar Rajumiya Shaikh
Date: 18-03-2026
19:30:16

**(कादर शेख)**
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद, सोलापूर**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा.उप सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

२) मा.शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे

३) मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे

**प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.**

१) गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, माळशिरस, जि.सोलापूर